महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मंबई • ठाणे • रायगड • पालघर

https://jeevandeepvarta.com

मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

शुक्रवार ■ 24 जानेवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 210 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

"शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची आज जयंती आहे.या निमित्ताने आज शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाकडून मुंबईतील बीकेसी येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत महायुतीचा झालेला विजय हा बाळासाहेबांच्या विचारामुळे झाला आहे.
"लोकसभेपाठोपाठ आपण विधानसभेत देखील शिवसेनेने ऐतिहासीक विजय मिळवला कारण बाळासाहेबांच्या धगधगत्या प्रेरणेने आणि विचाराने घडलेले आपण सर्व शिवसैनिक आहोत. बाळासाहेबांचा विचार आपण जिवापाड जपला म्हणून दणदणीत विजय आपल्याला मिळला आणि तो विजयउत्सव आज आपण साजरा करतोय".
"अडीच वर्षांपूर्वी आपण केलेला उठाव आणि त्यानंतर विजय इतक देदीप्यमान आणि ऐतिहासिक आहे की संपूर्ण महाराष्ट्र, देश नाही तर जगभरात या विजयाची चर्चा आहे. पुढच्या अनेक पिढ्या या विजयाची आठवण ठेवल्याशिवाय राहाणार नाहीत. हे यश बाळासाहेबांच्या विचारांचे आणि महायुतीच्या एकजुटीचं आहे. अडीच वर्ष केलेल्या कष्टाचं यश आहे. याबरोबरच राज्यातील माझ्या लाडक्या बहिणी, लाडके भाऊ, लाडके तरूण, लाडके शेतकरी आणि लाडक्या ज्येष्ठांचं यश आहे", - एकनाथ शिंदे



हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जयंतीदिनी

# दोन्ही शिवसेनांचे मेळावे !

दै·ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई: विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा पहिला मेळावा मुंबईतील अंधेरीत संपन्न झाला. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मेळाव्याचं आयोजन करण्यात आलेलं आहे. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा मेळावा बीकेसीमध्ये आयोजित करण्यात आला होता. विधानसभा निवडणुकीतील दणदणीत यशानंतर शिवसेनेचा हा पहिलाच मेळावा आहे. या दोन्ही मेळाव्यातील काही प्रमुख नेत्यांची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली. उद्धवसेनेच्या मेळाव्याला पक्षाचे आमदार, खासदार हजर होते. अनेक आजी, माजी आमदार, खासदारही उपस्थित होते. पण माजी आमदार राजन साळवी यांची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली. शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर राजन साळवी उद्धव ठाकरेंशी एकनिष्ठ राहिले. पण विधानसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. राजापूर मतदारसंघातून सलग तीनदा विजय मिळवणाऱ्या साळवी यांचा शिंदेसेनेच्या किरण सामंत यांनी पराभव केला. तेव्हापासून साळवी नाराज असल्याची चर्चा आहे. ते उद्या शिवसेनेत प्रवेश करतील अशी शक्यता आहे.

"सत्तेची जी दोन-अडीच वर्ष मिळाली त्यामध्ये पायाला भिंगरी लावून आपण काम केलं. एक मिनिटही वाया न घालवला नाही, म्हणून हा विजय आपल्याला मिळाला. बाळासाहेबांच्या जयंतीला मिळालेलं हे एक मोठं गिफ्ट आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. आज बाळासाहेब असते तर त्यांनी आपल्या सगळ्यांच्या पाठीवर शाबासकी दिली असती आणि पाठ थोपटली असती"
- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

## त्या क्षणी मी माझं पक्षप्रमुख पद सोडेन
-उद्धव ठाकरे

ज्यादिवशी माझा निष्ठावंत शिवसैनिक म्हणेल की उद्धव तू बाळासाहेबांचे विचार सोडले आहेत त्याक्षणी मी माझं पक्षप्रमुख पद सोडल्याशिवाय राहणार नाही. मला खात्री आहे की ज्या पद्धतीने संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या परिवारातला महाराष्ट्र, निर्दयीपणे माझ्याशी वागणार नाही. हार-जीत होत असते. पण मूळात हा विजय भाजपाच्या अनेक लोकांना पचलेला नाही. काहीतरी गडबड घोटाळा नक्की आहे, ईव्हीएमचा तर नक्कीच आहे. ज्या अमित शाह यांनी संपूर्ण सरकारी यंत्रणा वापरुन अडीच वर्षे घटनाबाह्य सरकार लादलं ते असातसा महाराष्ट्र सुटू देतील?" असा सवाल उद्धव ठाकरेंनी या मेळव्यतून उपस्थित केला.

# नायर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ

## रोजंदारीवर कार्यरत ७४ कर्मचाऱ्यांना ऑक्टोबरपासून वेतनच देण्यात आलेले नाही.



### दिवाळीचा बोनसही नाही

**तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार महानगरपालिका आयुक्तांनी या कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त पाच हजार रुपये बोनस जाहीर केला. मात्र या कर्मचाऱ्यांना अद्यापही बोनसची रक्कम मिळालेली नाही. आता सलग तीन महिने वेतन न मिळाल्याने या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळी आली आहे, असे प्रदीप नारकर यांनी सांगितले.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : नायर रुग्णालयामध्ये रोजंदारीवर कार्यरत असलेल्या ७४ कर्मचाऱ्यांना ऑक्टोबरपासून वेतनच देण्यात आलेले नाही. त्यामुळे या कर्मचाऱ्यांचे आर्थिक गणित बिघडले असून, त्यांची परिस्थिती बिकट झाली आहे. तीन महिने वेतन न मिळाल्याने घरखर्च कसा भागवायचा, मुलांच्या शाळांचे शुल्क, आई - वडिलांच्या औषधांचा खर्च कसा करायचा असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयामध्ये २००९-२०१० पासून किमान वेतनावर ७४ कर्मचारी रोजंदारी कामगार म्हणून काम करीत आहेत. मात्र ऑक्टोबरपासून सलग तीन महिने या कर्मचाऱ्यांना वेतन मिळालेले नाही. यासदर्भात कर्मचाऱ्यांनी वारंवार प्रशासनाकडे वेतनसाठी पाठपुरावा करूनही त्यांना समाधानकारक उत्तर मिळत नव्हते. अखेर म्युनिसिपल मजदूर युनियने यासंदर्भात नायर रुग्णालयातील प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता ७४ रोजंदारी कामगारांची मुळ नस्ती तत्कालीन वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रुग्णालयाचे संचालक यांचे कार्यालय असलेल्या केईएम रुग्णालयातून गहाळ झाल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाचे उप आयुक्त, अतिरिक्त आयुक्त व महानगरपालिका आयुक्त यांची मंजुरी घेण्यास विलंब होत आहे.

परिणामी, या कर्मचाऱ्यांना वेतन देण्यात अडचणी येत असल्याचे नायर रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले.

कामगारांची कोणतीही चूक नसताना व काम करूनही त्यांना तीन महिने वेतन न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. वेतन न मिळाल्याने घरखर्च कसा चालवायचा, मुलांच्या शाळांचे शुल्क कसे भरायचे, आई वडिलांच्या औषधांचा खर्च कसा करायचा असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला आहे. त्यामुळे या ७४ रोजंदारी कामगारांना ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४ या तीन महिन्यांचे वेतन तातडीने देण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात यावे, अशी मागणी म्युनिसिपल मजदूर युनियनचे सह सरचिटणीस प्रदीप नारकर यांनी नायर रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांकडे केली आहे.

# मशिदीवरील भोंगे प्रकरणी हायकोर्टाचा निर्णय

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील मशिंदींवर असलेल्या बेकायदेशीर भोंग्याबाबत सातत्याने तक्रारी केल्या जातात. मात्र, केवळ तेवढ्या पुरताच हा मुद्दा विचारात घेतला जातो. या तक्रारींची दखलही तात्पुरत्या स्वरुपातच घेतली जाते, त्यानंतर काही दिवसांतच पुन्हा हे भोंगे वाजले जातात. न्यायालयाने घालून दिलेल्या डेसिबलच्या मर्यादिचं उल्लंघन करत मशिंदीवरील भोंगे वाजले जातात. पहाटेच्या सुमारास वाजणाऱ्या या भोंग्यांचा त्रास सर्वच समुदायातील नागरिकांना होतो. त्याच अनुषंगाने दाखल याचिकेवर आज उच्च न्यायालयात अंतिम सुनावणी झाली. त्यावर, न्यायालयाने पोलिसांना स्पष्ट शब्दात निर्देश देत राज्य सरकारलाही सुनावले आहे. याचिकेवर सुनावणी करताना आता हायकोर्टाने ध्वनिप्रदूषणाशी संबंधित तक्रारी हाताळत कायद्याच्या अंमलबजावणीसाठी स्पष्ट कार्यपद्धती निश्चित केली आहे. दरम्यान, मनसेकडूनही सातत्याने हा मुद्दा विचारात घेतला जाऊन कारवाईसंदर्भाने तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत.

जेव्हा ध्वनिप्रदूषणाबाबत पहिली तक्रार दाखल केली जाते तेव्हाच पोलिसांनी तात्काळ दखल घेत उल्लंघन करणाऱ्याला ध्वनिप्रदूषण नियमांचे उल्लंघन केल्याची माहिती द्यावी. याप्रकरणी कायद्याची कठोर अंमलबजावणी होणं गरजेचं आहे. उल्लंघन करणाऱ्याविरुद्ध दुसरी तक्रार दाखल झाल्यास, पोलिसांनी ध्वनी प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या दंडाची तरतूद असलेल्या महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम 136 नुसार कारवाई करणं आवश्यक असल्याचं उच्च न्यायालयाने आदेशात म्हटले. तसेच, त्यानंतरच्या तक्रारींच्या बाबतीत, न्यायालयानं उल्लंघनास कारणीभूत असलेले लाऊडस्पीकर काढून टाकण्याचे आणि जप्त करण्याचे निर्देश पोलिसांना दिले आहेत. या कडक उपायांमुळे पुनरावृत्ती होणाऱ्या गुन्ह्यांवर प्रतिबंधक म्हणून काम करणे अपेक्षित आहे. मुंबई उच्च न्यायालयाने डॉ.महेश विजय बेडेकर विरुद्ध महाराष्ट्र राज्य यांच्यामध्ये दिलेल्या निकालाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याचे निर्देशही राज्य सरकारला दिले आहेत.

# अंबरनाथमध्ये मद्यधुंद ट्रेलर चालकाची वाहनांना धडक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



अंबरनाथ: मद्यधुंद ट्रेलर चालकाने उलट दिशेने ट्रेलर चालवत पोलिसांच्या गाडीसह किमान ५० वाहनांना धडक दिल्याची खळबळजनक घटना अंबरनाथजवळ घडली आहे. या ट्रेलर चालकाला पोलीस आणि रिक्षाचालकांनी पाठलाग करत पकडले आहे. काटई अंबरनाथ राज्यमार्गावर गुरुवारी दुपारी ही घटना समोर आली. अंबरनाथहून डोंबिवलीच्या दिशेने जाणाऱ्या बदलापूर पाईपलाईन रोडवर हा अपघात घडला. नेवाळी नाका येथून बदलापूरच्या दिशेने निघालेल्या एका भरधाव ट्रेलरने नेवाळी नाक्यावर एका वाहनाला जोरदार धडक दिली. त्यानंतर पालेगाव, अंबरनाथ आनंदनगर पोलीस चौकी, वैभव हॉटेल चौक, सुदामा हॉटेल चौक असा संपूर्ण रस्ता भरधाव वेगात मार्गिकेवर उलट्या दिशेने ट्रेलर चालवत हा चालक निघाला. मार्गात समोर येणाऱ्या प्रत्येक वाहनाला त्याने धडक देत ट्रेलर पुढे नेला. यात कार, दुचाकी, रिक्षा, इतकेच नव्हे, तर पोलिसांच्याही गाडीला त्याने धडक दिली. तर मार्गातीलच एका दुचाकीस्वाराला त्याने रॉडने मारहाण करून जखमी केले.

# केडीएमसीने फेटाळले अनधिकृत इमारत नियमितीकरणाचे प्रस्ताव

दै· ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण डोंबिवली मधील 58 बेकायदा इमारत प्रकरणी कायद्याच्या चौकटीत बसणाऱ्या इमारतींना नियमित करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार 6 बेकायदा इमारतींमधील रहिवासी, विकासकांनी कल्याण डोंबिवली पालिकेच्या नगररचना विभागाकडे इमारत नियमितीकरणासाठी अर्ज दाखल केले होते. इमारत नियमितीकरणासाठी लागणारी अत्यावश्यक कागदपत्रे रहिवासी नगररचना विभागात वेळ देऊनही दाखल करू शकले नाहीत. त्यामुळे बेकायदा इमारत नियमितीकरणाचे सहा प्रस्ताव फेटाळून लावण्यात आले आहेत, अशी माहिती कल्याण डोंबिवली पालिका नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.**

कल्याण : सहा बेकायदा इमारतींमधील रहिवासी, विकासकांना त्रुटी पत्र पाठवून आवश्यक कागदपत्रे विहित वेळेत पालिकेत दाखल करा, असे कळविण्यात आले आहे. 3 फेब्रुवारीच्या आत कागदपत्रे दाखल केली तर त्या इमारतींच्या नियमितीकरणाचा विचार केला जाईल. अन्यथा, या 6 बेकायदा इमारतींचे प्रस्ताव का फेटाळले याची माहिती न्यायालयात येत्या सुनावणीच्या वेळी देण्यात येणार आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

न्यायालयाने गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये डोंबिवलीत बेकायदा इमारतींना महारेराचा नोंदणी क्रमांक मिळवून उभारण्यात आलेल्या 65 इमारती येत्या तीन महिन्यात (19 फेब्रुवारीपर्यंत) तोडण्याचे आदेश दिले आहेत. पालिकेने या मधील सात इमारती यापूर्वीच जमीनदोस्त केल्या आहेत. उर्वरित 58 इमारतींमधील रहिवासी, विकासकांना पालिकेने इमारती रिकाम्या करण्याच्या नोटिसा दिल्या आहेत. या नोटिसीप्रमाणे दत्तनगरमधील बेकायदा इमारत विकासक प्रफुल्ल गोरे यांनी स्वतःहून तोडण्याचे काम सुरू केले आहे. 58 मधील 16 बेकायदा इमारतींमधील रहिवाशांनी आम्ही पालिकेकडे इमारत नियमितीकरणासाठी अर्ज दाखल केले आहेत, अशी भूमिका मुंबई उच्च न्यायालयात घेतली. पालिकेच्या तोडकाम कारवाईला स्थगिती देण्याची मागणी केली होती. न्यायालयाने या मागणीचा विचार करून 3 फेब्रवारीपर्यंत प्रस्ताव दाखल 16 इमारतींवर कारवाई न करण्याचे आदेश पालिका प्रशासनाला दिले होते.

# रेल्वेमार्गात बाधित होणाऱ्यांना भरपाई द्या !

## शिवसेना शहरप्रमुख राजेंद्रसिंह भुल्लर यांचे आयुक्तांना साकडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



उल्हासनगर - कल्याण ते कसारा या दरम्यान रेल्वेने तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे लाईनचे काम हाती घेतले आहे. त्यात शहाड मधील 2500 कुटुंब उध्वस्त होणार असून त्यांच्या घरांवर बुलडोझर फिरवण्यात येणार आहे. त्यामुळे बेघर होणाऱ्या या कुटुंबियांना मोबदला किंवा नुकसान भरपाई देऊन न्याय देण्यात यावा अशी हाक शिवसेनेचे शहरप्रमुख राजेंद्रसिंह भुल्लर-महाराज यांनी उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांना निवेदनाद्वारे दिली आहे. उल्हासनगर - कल्याण ते कसारा या दरम्यान रेल्वेने तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे लाईनचे काम हाती घेतले आहे. त्यात शहाड मधील 2500 कुटुंब उध्वस्त होणार असून त्यांच्या घरांवर बुलडोझर फिरवण्यात येणार आहे. त्यामुळे बेघर होणाऱ्या या कुटुंबियांना मोबदला किंवा नुकसान भरपाई देऊन न्याय देण्यात यावा अशी हाक शिवसेनेचे शहरप्रमुख राजेंद्रसिंह भुल्लर-महाराज यांनी उल्हासनगर महानगरपालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांना निवेदनाद्वारे दिली आहे. या परिसरात गेल्या 50 वर्षांपासून शेकडोंच्या संख्येने पक्की घरे असून, त्यात जवळपास 2500 कुटूंब गुण्यागोविंदाने राहत आहेत. व्यापाऱ्यांचे व्यावसायिक गाळे, दुकाने आहेत. हे सर्व महानगरपालिकेच्या मालमत्ता कराचा भरणा नित्याने करत असून मुलांबाळांसह ते स्थायिक झालेले आहेत. अशा प्रसंगी रेल्वेने कल्याण ते कसारा दरम्यान तिसरी आणि चौथी लाईन टाकण्याचे काम हाती घेतले असून ह्या लाईनी व्हाया शहाड मार्गे पुढे जाणार आहेत. हे रेल्वेचे काम असल्याने आणि ह्या वसाहती महानगरपालिकेच्या हद्दीत येत असल्यामुळे या कुटुंबियांना उध्वस्त करण्यापूर्वी त्यांना मोबदला देण्यासाठी किंवा त्यांचे पुनर्वसन करण्याकरिता पुढाकार घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्याची मागणी शिवसेना शहरप्रमुख राजेंद्रसिंह भुल्लर-महाराज यांनी आयुक्त मनिषा आव्हाळे यांच्याकडे केली आहे. भुल्लर-महाराज यांनी दिलेल्या हाकेला व करण्यात आलेल्या मागणीला आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

# गीतासार



अर्जुन उवाच
कथं भीष्ममहं संख्ये
द्रोणं च मधुसूदन ।
इषुभिः प्रति योत्स्यामि
पूजार्हावरिसूदन ॥२- ४॥

अर्थ

अर्जुन म्हणाला, हे मधुसूदना, युद्धात मी भीष्मपितामहांच्या आणि द्रोणाचार्यांच्या विरुद्ध बाणांनी कसा लढू? कारण हे अरिसूदना, ते दोघेही पूज्य आहेत. ॥ २-४ ॥

गुरूनहत्वा हि
महानुभावान् श्रेयो भोक्तुं
भैक्ष्यमपीह लोके ।
हत्वार्थकामांस्तु
गुरूनिहैव भुञ्जीय भोगान्
रुधिरप्रदिग्धान् ॥२- ५॥

अर्थ

म्हणून या महानुभाव गुरुजनांना न मारता मी या जगात भिक्षा मागून खाणेही कल्याणकारक समजतो. कारण गुरुजनांना मारूनही या लोकात रक्ताने माखलेले अर्थ व कामरूप भोगच ना भोगावयाचे. ॥ २-५ ॥

न चैतद्विद्मः कतरन्नो
गरीयो यद्वा जयेम यदि
वा नो जयेयुः ।
यानेव हत्वा न जिजीविषाम-
स्तेऽवस्थिताः प्रमुखे
धार्तराष्ट्राः ॥२- ६॥

अर्थ

युद्ध करणे व न करणे या दोहोंपैकी आम्हाला काय श्रेष्ठ आहे, हे कळत नाही. किंवा आम्ही त्यांना जिंकू की ते आम्हाला जिंकतील, हेही आम्हाला माहीत नाही. आणि ज्यांना मारून आम्हाला जगण्याचीही इच्छा नाही, तेच आमचे बांधव-धृतराष्ट्रपुत्र-आमच्या विरुद्ध उभे आहेत. ॥ २-६ ॥

# ब्रेन रॉट म्हणजे नेमकं काय?




तुमचा मेंदू पूर्वीप्रमाणे कुशाग्रपणे काम करत नाही अशी जाणीव तुम्हाला झाली आहे का? किंवा तुमचा मेंदू पूर्वीप्रमाणे गोष्टी स्मरणात ठेवत नाही असं कधी वाटलं आहे का? असं वाटत असेल तर 'ब्रेन रॉट' हा शब्दही तुम्ही वाचलाच असेल. या शब्दाला २०२४ मध्ये ऑक्सफर्ड शब्दाचा मानकरी असा बहुमान मिळाला आहे. मात्र ब्रेन रॉट म्हणजे काय? यापासून वाचण्यासाठी काय उपाय करता येतात? हे आपण जाणून घेऊ.

'ब्रेन रॉट' म्हणजे काय ?

शब्दकोशात दिलेल्या अधिकृत अर्थानुसार, 'ब्रेन रॉट' म्हणजे एखाद्या व्यक्तीचे मानसिक किंवा बौद्धिक आरोग्य काही प्रमाणात बिघडणे. विशेषतः अतिशय किरकोळ अशा ऑनलाइन साधनांच्या अतिवापरामुळे होणारा परिणाम. याचा थोडक्यात उलगडा करून सांगायचा झाल्यास सोशल मीडियावर तासन् तास रील पाहणे, अपडेट्स पाहणे, नोटिफिकेशन्सवर लक्ष ठेवणे अशा बाबींमुळे मनावर परिणाम होतो. एकाग्रता भंग पावते. मन विचलित होते. सातत्याने हात मोबाइलकडे जातात. सामाजिक स्वास्थ्य बिघडते. एकांगीपणा वाढतो. संवाद हरवतो. मेंदूच्या अशा स्थितीची मांडणी करायची झाल्यास त्याला 'ब्रेन रॉट' असं म्हणतात.

ब्रेन रॉटचे शरीरावर काय दुष्परिणाम होतात?

१) एकाग्रता कमी होते, दीर्घ काळ लागणारी कामं करण्याची इच्छा होत नाही.
२) आपल्याला ज्या गोष्टी करायच्या असतात त्या विसरी पडतात, अनेकदा दैनंदिन कामंही नीटशी आठवत नाहीत.
३) मोबाइलवर सतत स्क्रोलिंग करणं, सोशल मीडिया पाहिला नाही तर अस्वस्थ वाटणं, सतत ऑनलाइन राहणं यामुळे मेंदू अलर्ट मोडवर राहतो.
४) स्क्रीन टाइम वाढल्याने प्रत्यक्ष संवाद करण्याची क्षमता अनेकदा हरवते. कुटुंबीयांनाही मेसेज किंवा चॅट करुन संवाद साधला जातो.
५) झोपेवर परिणाम होत असल्याने मेंदूची नको असलेली माहिती काढून टाकण्याच्या प्रक्रियेवर विपरित परिणाम. त्यातून मेंदूची कार्यक्षमता कमी होते.

असे दुष्परिणाम ब्रेन रॉटमुळे पाहण्यास मिळतात. सोशल मीडियाचा मर्यादित वापर, स्क्रीन टाइम मर्यादित ठेवणं या आणि अशा उपायांद्वारे ब्रेन रॉट मधून बाहेर येता येतं.

ब्रेन रॉटमधून बाहेर येण्यासाठी काय उपाय करता येतात?

१) आपल्या शरीराला सर्वात महत्त्वाची असते ती म्हणजे झोप. योग्य वेळेत झोप घेणं आणि शरीरासह मेंदूला आराम देणं महत्त्वाचं ठरतं.
२) झोपण्यापूर्वी किमान १५ ते ३० मिनिटं आधी स्क्रीन पाहणं टाळणे, रोज किमान सात ते आठ तास झोप घेणं. झोपेच्या मधे जाग आल्यास मोबाइल न पाहणं
३) स्क्रीन टाइम मर्यादित ठेवणं, दैनंदिन व्यायाम, वेळेवर जेवण अशी दिनचर्या आखून घेणं
४) सोशल मीडिया, आभासी जग यापेक्षा आठवड्यातून किमान एकदा जवळच्या व्यक्तीची भेट घेणं, नातेवाईकांना भेटणं.
५) मोबाइल किंवा कुठल्याही स्क्रीन ऐवजी पुस्तकं, वर्तमानपत्रं, इतर छंद यांमध्ये वेळ घालवणं. फिरायला जाणं. सायकलिंग करणं.

असे सोपे आणि अगदी सहज शक्य असलेले उपाय योजल्यास ब्रेन रॉटमधून बाहेर पडता येतं.

# डॉ होमी जहांगीर भाभा



भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज स्मृतिदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

- श्याम बसप्पा ठाणेदार

# पांडा पॅरेंटिंग



आजच्या काळात मुलांचे संगोपन करणे हे एक मोठे आव्हान बनले आहे. पालकांना त्यांच्या मुलांना सर्वोत्तम द्यायचे असते, पण बऱ्याचदा त्यांना त्यांना कसे वाढवायचे हे माहित नसते. अनेक पालक आपल्या मुलांना योग्य संगोपन देत आहेत की नाही याबद्दल गोंधळलेले असतात. पांडा पॅरेंटिंग हा या समस्येवरचा एक उपाय आहे. पांडा पॅरेंटिंग ही एक पालकत्व शैली आहे जी मुलांना स्वतंत्र, आत्मविश्वासू आणि जबाबदार बनण्यास मदत करते. आज या लेखात, पांडा पॅरेंटिंग म्हणजे काय आणि त्याचे फायदे काय आहेत ते जाणून घ्या.

पांडा पॅरेंटिंग ही एक पालकत्व शैली आहे जी मुलांना स्वातंत्र्य देते पण त्याच वेळी त्यांना सुरक्षिततेची भावना देखील देते. पांडा पालक त्यांच्या मुलांना शिकण्यासाठी आणि वाढण्यासाठी प्रोत्साहित करतात. ते मुलांना स्वतःच्या चुका करण्याची आणि त्यातून शिकण्याची संधी देतात.

पांडा पॅरेंटिंग चे फायदे

स्वातंत्र्य: पांडा पालकत्वात, मुलांना त्यांच्या आवडी-निवडी निवडण्याचे स्वातंत्र्य असते. यामुळे मुले आत्मविश्वासू आणि स्वतंत्र होतात.

जबाबदारी: पांडा पालकत्वामध्ये, मुलांना स्वतःची जबाबदारी घेण्याची संधी दिली जाते. यामुळे मुले जबाबदार आणि शिस्तबद्ध होतात.

सर्जनशीलता: पांडा पालकत्व मुलांना त्यांची सर्जनशीलता दाखवण्याची संधी देते. यामुळे मुलांना नवीन कल्पना आणि कौशल्ये विकसित होण्यास मदत होते.

आत्मविश्वास: पांडा पालकत्वामध्ये मुलांच्या कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक करणे समाविष्ट आहे. यामुळे मुलांचा आत्मविश्वास वाढतो.

समस्या सोडवणे: पांडा पालकत्व मुलांना त्यांच्या समस्यांवर स्वतः उपाय शोधण्याची संधी देते. यामुळे मुलांमध्ये समस्या सोडवण्याचे कौशल्य विकसित होण्यास मदत होते.

पांडा पॅरेंटिंग कसे करावे? -

मुलांचे ऐका: मुलांचे लक्षपूर्वक ऐका आणि त्यांच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करा.

मुलांना निवडू द्या: मुलांना त्यांच्या आवडीची खेळणी, कपडे इत्यादी निवडू द्या.

मुलांना चुका करू द्या: मुलांना चुका करू द्या आणि त्यांना त्यांच्याकडून शिकण्याची संधी द्या.

मुलांना प्रोत्साहन द्या: मुलांना त्यांच्या कामगिरीसाठी प्रोत्साहित करा.

मुलांसोबत वेळ घालवा: मुलांसोबत खेळा, गप्पा मारा आणि संस्मरणीय क्षण निर्माण करा.


पांडा पॅरेंटिंग चे तोटे

पांडा पालनपोषणाचे काही तोटे देखील असू शकतात, जसे की:

मुले खूप स्वतंत्र होऊ शकतात: जर मुलांना जास्त स्वातंत्र्य दिले तर ते अनुशासनहीन होऊ शकतात.

मुलांना समस्यांना तोंड देण्यात अडचण येऊ शकते: जर मुलांना नेहमीच मदतीची आवश्यकता असेल तर ते स्वतःहून समस्यांवर उपाय शोधण्यास शिकणार नाहीत. पांडा पालकत्व हा मुलांना वाढवण्याचा एक उत्तम मार्ग आहे. हे मुलांना स्वतंत्र, आत्मविश्वासू आणि जबाबदार बनवते. तथापि, पांडा पालकत्व अंमलात आणताना संतुलन राखणे खूप महत्वाचे आहे.

# जत्रा हॉटेलची शाखा कल्याणमध्ये सुरू



कल्याण : सांगली जिल्ह्यातील आटपाडी येथील प्रसिद्ध जत्रा हॉटेलची नवी शाखा आता कल्याणमध्ये देखील सुरू करण्यात आली आहे. काटई-बदलापूर रोडवरील खोणी गावात जत्रा हॉटेलचे उदघाटन बुधवारी दिमाखात करण्यात आलं. कल्याण-डोंबिवली महापालिकेचे माजी नगरसेवक महेश गायकवाड आणि आयआरएस अधिकारी डॉ.सचिन मोटे व सोरखादे परिवार यांच्या प्रमुख उपस्थितीत उदघाटन सोहळा पार पडला. याप्रसंगी कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ तसेच सांगली मधील विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. या वेळी डीडीएसआर ग्रुपचे राहुल हजारे, हणमंत मोटे, वामन कोकरे आणि विठ्ठल घोडगे यांनी उपस्थित मान्यवरांचा सन्मान व सत्कार केला.

जत्रा हॉटेलबद्दल माहिती देताना हणमंत मोटे यांनी सांगितले की, सांगली जिल्ह्यातील आटपाडी येथे जत्रा हॉटेल सुरू करण्यात आले होते. त्यानंतर पनवेलमध्ये 'सात बारा' या नावाने दुसरी शाखा, तर आता खोणी येथे जत्रा हॉटेलची तिसरी शाखा सुरू करण्यात आली आहे. मोटे यांनी हॉटेलच्या वैशिष्ट्याबद्दल बोलताना म्हटलं की घाटमाथ्यावरील मसाल्यांपासून बनवलेले चविष्ट खाद्यपदार्थ हॉटेल मध्ये उपलब्ध असल्याने घाटमाथ्यावरच्या अस्सल चवदार जेवणाचं आस्वाद कल्याण डोंबिवलीकरांना घेता येणार आहे.

आरोग्य टिप्स

# मध आणि अक्रोडाचे निरोगी मिश्रण



अक्रोड आणि मध यांचे निरोगी मिश्रण

अक्रोडाचे मधासह सेवन केल्याने त्याचे फायदे आणि गुणधर्म वाढतात. अक्रोड मधासह खाल्ल्याने त्यातील चरबी आणि अँटीऑक्सिडंट्स सक्रिय होतात. हे तुमच्या एकूण आरोग्यासाठी फायदेशीर ठरते.

पोषक तत्वांची पातळी वाढते

मधात बुडवलेले अक्रोड खाल्ल्याने त्यात आढळणाऱ्या आहारातील फायबर आणि अँटिऑक्सिडंट्सचा प्रभाव वाढतो. जेव्हा तुम्ही या दोन्ही गोष्टींचे सेवन करता तेव्हा तुम्हाला या पोषक तत्वांचे फायदे वाढतात.

ऊर्जा वाढते.

सुक्या मेव्या आणि मध दोन्हीमध्ये नैसर्गिक साखर असते. जेव्हा तुम्ही या दोन्ही गोष्टी एकत्र खाता तेव्हा तुम्हाला त्वरित ऊर्जा मिळते.

पचनशक्ती वाढते

सुक्या मेव्यामध्ये आहारातील फायबर असते जे पचन सुधारण्यास मदत करते. यामुळे तुमच्या पोटाच्या समस्या कमी होतात आणि आतड्यांची हालचाल वाढते.

# कोबीची झणझणीत रेसिपी



कोबीची भाजी, कोबीची भजी अशा अनेक कोबीच्या रेसिपी तुम्ही घरच्याघरी बनवून पाहिल्या आहेत. पण या हिवाळ्यात तुम्हाला झणझणीत जर काही वेगळं आणि झणझणीत खायचं असेल तर तुम्ही कोबीचा खिमा तयार करू शकता. ही रेसिपी वाचूनच तुमच्या तोंडाला पाणी सुटेल.

साहित्य

एक कोबी,तेल,जीरे,चिरलेली लसूण,हिरवी मिरची
,१ चिरलेला कांदा,१ चिरलेला टोमॅटो,१ टेबलस्पून मीठ,१ टेबलस्पून काश्मीरी लाल मिरची पूड,
१ टेबलस्पून धणे पूड,१ टेबलस्पून गरम मसाला,
उकडलेले मटार,कोथिंबीर

रेसिपी

एक कोबी घ्या. त्याचे तुकडे करा. उकळलेल्या पाण्यात धुवून घ्या आणि मग चिरा.
नंतर एका कढईत तेल घाला, आणि त्यात जीरे, चिरलेली लसूण आणि हिरवी मिरची घाला.
त्यात १ चिरलेला कांदा, १ चिरलेला टोमॅटो, १ टेबलस्पून मीठ, १ टेबलस्पून काश्मीरी लाल मिरची पूड, १ टेबलस्पून धणे पूड आणि १ टेबलस्पून गरम मसाला घाला.
त्यात चिरलेली कोबी आणि उकडलेले मटार घाला.
छान मिक्स करा आणि ५ मिनिटे शिजवा.
कोथिंबीरने सजवा आणि आनंद घ्या.

# महाज्योतीच्या वतीने विद्यार्थ्यांना टॅब वाटप

रायगड : सध्या स्पर्धेच्या काळात ऑनलाईन शिक्षणाला अधिक महत्त्व प्राप्त झाल्यामुळे इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर या संस्थेच्या वतीने मोफत टॅबचे वाटप करण्यात आले आहे. विदयार्थ्यांनी याचा गुणवत्ता वाढीसाठी उपयोग करावा असे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृह येथे महाज्योती संस्थेच्यावतीने मोफत टॅब वाटप कार्यक्रमात जिल्हाधिकारी बोलत होते.यावेळी सहायक आयुक्त समाज कल्याण समाधान इंगळे उपस्थित होते. जिल्हाधिकारी यांच्या हस्ते महाज्योतीमार्फत इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील २४विद्यार्थ्यांना मोफत टॅबचे वाटप करण्यात आले.

महाज्योती योजनेअंतर्गत, विज्ञान शाखेच्या अंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना MHT-CET/JEE/NEET-2025 साठी मोफत कोचिंगसाठी मोफत टॅब्लेटचे वाटप केले जाते. ज्याचा वापर करून आर्थिकदृष्ट्या मागासलेले विद्यार्थी त्यांच्या शिक्षणाचा आणि त्यांना मिळालेल्या या सुविधांचा उपयोग करून त्यांचे भविष्य सुधारू शकतात.महाज्योती संस्थेच्यावतीने गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत ऑनलाईन प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्या अनुषंगाने या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मोफत टॅब सोबत दररोज सहा जीबी इंटरनेट डेटाची सुविधा नीट परीक्षा होईपर्यंत साधारण दीड वर्षे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# कापूस उत्पादनामुळे कापड उद्योगाला दिलासा



मुंबई : कॉटन असोशिएशन ऑफ इंडियाने (सीएआय) देशातील कापूस उत्पादनात वाढीचा अंदाज व्यक्त केला आहे. आपल्या या पूर्वीच्या अंदाजात वाढ करीत २०२४ – २५ च्या हंगामात देशभरात ऑक्टोबर २०२५ अखेर ३०४.२५ तर स लाख कापूस गाठींचे (एक गाठ – १७० किलो रुई) उत्पादन होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

देशातील सुमारे अकरा राज्यात कापूस उत्पादन होते. यंदा महाराष्ट्रातून सर्वाधिक ९० लाख गाठींच्या उत्पादनाचा अंदाज आहे. त्याखालोखाल गुजरातमधून ८० लाख गाठी, तेलंगाणातून ४२ लाख गाठी, कर्नाटकातून २३ लाख गाठी, मध्य प्रदेशातून १९ लाख गाठी आणि आंध्र प्रदेशातून ११ लाख गाठींच्या उत्पादनाचा अंदाज आहे. दरम्यान, डिसेंबरअखेर १७६.०४ लाख कापूस गाठींचा पुरवठा झाला आहे. तर १२ लाख गाठींची आयात झाली आहे. सीएआयच्या अंदाजनुसार देशात गत हंगामातील ३०.१९ लाख गाठी कापूस शिल्लक होता. डिसेंबरअखेर कापड उद्योगाने एकूण ८४ लाख गाठींचा वापर केला आहे. तर सात लाख गाठींची निर्यात झाली आहे. कापूस उत्पादन, गतवर्षांचा साठा आणि संभाव्य आयातीचा विचार करून सीएआयने कापूस हंगाम २०२४-२५ मध्ये सप्टेंबर २०२५ अखेर एकूण ३५९.४४ लाख गाठींचा पुरवठा होण्याचा अंदाज आहे. दरम्यान, खासगी बाजारात व्यापारी कापसाला प्रति क्विंटल ६५०० ते ७००० रुपये दर देत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांकडून कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडियाकडून (सीसीआय) हमीभावाने ७५०० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी वाढविण्याची मागणी होत आहे. त्यानुसार सीसीआयने खरेदी वाढवली आहे. सध्या बाजारात येणाऱ्या कापसापैकी ६० ते ६५ टक्के कापूस सीसीआय खरेदी करीत आहे.

# शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे जयंती दिनी महापालिकेतर्फे अभिवादन



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी) :

नेताजी सुभाषचंद्र बोस व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती दिनी आज त्यांच्या प्रतिमेस आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या समयी उपआयुक्त स्वाती देशपांडे, अतुल पाटील, प्रसाद बोरकर, संजय जाधव, महापालिका सचिव किशोर शेळके, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, घन:श्याम नवांगुळ तसेच महापालिकेच्या इतर अधिकारी व कर्मचारी वर्गाने देखील त्यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करुन अभिवादन केले. तद्नंतर आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी सुभाष चौक, कल्याण (प.) येथील नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. कल्याण पश्चिमेतील, प्रबोधनकार ठाकरे सरोवर (शेनाळे तलाव) येथील शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुतळयास आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी पुष्पसुमने अर्पण करुन अभिवादन केले. या वेळी महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची छायाचित्रे व चीजवस्तू जतन केलेल्या संग्रहालयास भेट देऊन त्याची पाहणी केली.

# कामोठे पालिका शाळा पूर्णत्वास येणार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पनवेल(प्रतिनिधी) :

पनवेल महापालिकेच्या स्थापनेला आठ वर्षे पुर्ण झाल्यानंतर सिडको वसाहतींमधील कामोठे येथे दोन ठिकाणी आणि तळोजात एका ठिकाणी पालिका प्रशासन प्राथमिक शाळा उभारणार आहे. मागील अनेक वर्षांपासून येथील पालकांकडून पालिकेच्या शाळा सुरू करण्याची मागणी केली जात आहे. पुढील दोन वर्षांत या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश सुरू करण्याचे नियोजन पालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी आखले आहे.

पनवेल महापालिकेची वार्षिक उलाढाल सुमारे चार हजार कोटी रुपयांची आहे. पालिका सामान्यांकडून शिक्षण कर आकारते. मात्र सिडको वसाहतींमध्ये राहणाऱ्यांना अद्याप पालिका शिक्षण देत नाही. पालकांना पदरमोड करुन खासगी शाळेत शिकवावे लागते. छोटाशिशू, बालवाडी ते सातवी इयत्तेपर्यंत २० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांसाठी पालिकेने शिक्षण धोरण बनविण्याचे काम पूर्ण केले आहे. सध्या पनवेल महापालिकेच्या स्वमालकीच्या शाळा फक्त पनवेल शहरातच आहेत. फक्त पनवेल शहरातील या शाळांमध्ये हजारांवर पालिकेचा पट गेला नाही.

तळोजा, कळंबोली, कामोठे, खारघर, नावडे या वसाहतींमध्ये आणि २९ गावांमध्ये पालिकेच्या स्वताच्या शाळा नाहीत. हे विद्यार्थी रायगड जिल्हापरिषदेच्या शाळांवर अवलंबून आहेत. जिल्हापरिषदेच्या ५१ शाळांचे अजूनही हस्तांतरण पालिकेकडे न झाल्याने पालिकेने स्वत:च्या शाळा बांधण्याचे धोऱण आखले आहे. आयुक्तांच्या पाठपुराव्यामध्ये त्यांना तत्कालिन आयुक्त गणेश देशमुख यांची महत्वाची साथ मिळाली आहे. देशमुख हे सिडको मंडळाचे विद्यमान सह व्यवस्थापकीय संचालक आहेत. सिडको मंडळाकडून पनवेल पालिकेला मिळणारे भूखंड हस्तांतरणाचे काम देशमुख यांच्यामुळे जोरदार सुरू आहे. याच प्राप्त भूखंडावर तळोजा फेस १ मधील सेक्टर ७ तसेच कामोठे वसाहतीमध्ये शाळेच्या इमारती बांधण्यासाठी अंदाजपत्रक बनविण्याचे काम पालिकेने सुरू केले आहे.

एक एकरात शाळा आणि मैदान सोमवारी पालिकेच्या विभाग प्रमुखांच्या बैठकीत या शाळांचे कामकाज सुरू करण्याची सूचना आयुक्त चितळे यांनी शहर अभियंता संजय कटेकर यांना केली. या शाळेच्या इमारती सुमारे एक एकर जागेवर उभारल्या जाणार असून शाळेला मैदान सुद्धा उपलब्ध होणार आहे.

# सैफ हल्लाप्रकरणी पोलिसांच्या हाती सबळ पुरावा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
नवी मुंबई(प्रतिनिधी) :

बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर गुरुवारी (16 जानेवारी) प्राणघातक हल्ला झाला. सैफ अली खानच्या घरी चोरीच्या उद्देशाने शिरलेल्या एका चोराने चाकू हल्ला केला. या हल्ल्यात सैफ अली खानला गंभीर दुखापत झाली. त्याच्यावर लिलावती रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली. सध्या सैफ अली खानला डिस्चार्ज देण्यात आला असून त्याला विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तर दुसरीकडे या प्रकरणातील मुख्य आरोपी असलेल्या विजय दासला अटक करण्यात आली आहे. ठाण्यातील कासारवडवली भागातून त्याला अटक करण्यात आली. सैफ अली खानवर अटक करणाऱ्या आरोपीला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. सध्या त्याची कसून पोलीस चौकशी सुरु आहे. त्यातच आता एक धक्कादायक माहिती समोर आली आहे.

सैफ अली खानवर झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर 4 दिवसांनी मुंबई पोलिसांनी आरोपीच्या मुसक्या आवळल्या. मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजाद उर्फ विजय दास असे या आरोपीचे नाव आहे. तो बांगलादेशचा नागरिक असल्याचा दावा पोलिसांनी केला होता. आता चौकशीदरम्यान विजय दास हा बांगलादेशी असल्याचा एक ठोस पुरावा पोलिसांच्या हाती लागला आहे. सैफ अली खानवर हल्ला करणाऱ्या मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजाद याचा वाहतुकीचा परवाना समोर आला आहे. हा परवाना बांगलादेशातील असून त्यावर नाव, पत्ता, जन्मदिनांक तसेच इतर माहितीही नमूद करण्यात आली आहे.

सैफवर हल्ला करणाऱ्या आरोपीचे लायसन्स पोलिसांच्या हाती

सैफवर हल्ला करणाऱ्या मोहम्मद शरीफुल इस्लाम शहजाद याचे वाहतुकीचे लायसन्स पोलिसांच्या हाती लागले आहे. या लायसन्सवर बांगलादेश रोड ट्रान्सपोर्ट ऑथरिटी असे लिहिण्यात आले आहे. यावर बरिसल असे लिहिण्यात आले असून त्याचा पत्ताही बरिसल सदर, बरिसल असा आहे.

शहजादला हे लायसन्स 21 नोव्हेंबर 2019 ला बांगलादेश रोड ट्रान्सपोर्ट ऑथरिटीकडून देण्यात आले आहे. हे लायसन्स 21 फेब्रुवारी 2020 रोजी संपले आहे. हे लायसन दुचाकी आणि हलक्या वाहनांसाठी देण्यात आले आहे. यावर त्याची 12 मार्च 1994 अशी त्याची जन्मतारीखही दिसत आहे. तसेच यावर त्याचा फोन नंबरही नमूद करण्यात आला आहे. यासोबतच यावर त्याचा फोटोही पाहायला मिळत आहे.

नवी मुंबईत बांगलादेशी नागरिकांवर कारवाई

दरम्यान अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ला करणारा बांगलादेशी असल्याचे समोर येताच नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे ॲक्शन मुडवर दिसून येत आहे. सध्या नवी मुंबईत अनेक बांगलादेशी नागरिकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केली जात आहे. नवी मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणात बांगलादेशी राहताना दिसून येत आहेत. झोपड्या, अनधिकृत बांधकामांमध्ये यात बांगलादेशी आश्रय घेत आहेत. तसेच यांनी बनावट पॅनकार्ड, आधारकार्डही बनवले आहेत.

गेल्या महिनाभरामध्ये बांगलादेशातील संशयित म्हणून हजारोंपेक्षा अधिक नागरिकांना ताब्यात घेण्यात आले आहे. तर 125 जणांना अटक करण्यात आली आहे. तसेच 300 जणांचे कागदपत्र तपासण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे कागदपत्र आढळून आले तर त्यांच्यावर सुद्धा कारवाई केली जाणार आहे. आतापर्यंत 50 जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# ‘आदर्श जिल्हा’ आणि ‘उत्तम कार्यकर्ता’ पुरस्कार जाहीर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे(प्रतिनिधी) :

राजपत्रित महासंघाच्या 39 व्या वर्धापनदिनानिमित्त शुक्रवार, दि.07 फेब्रुवारी 2025 रोजी आयोजित विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर मान्यवरांच्या हस्ते अधिकारी महासंघ कल्याणकेंद्र (नियोजित), बांद्रा (पूर्व), मुंबई 400 051 येथे “आदर्श जिल्हा” पुरस्कारप्राप्त जिल्हा समिती आणि “उत्तम कार्यकर्ता” पुरस्कारप्राप्त अधिकाऱ्यांना गौरविण्यात येणार आहे, असे महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे मुख्य सल्लागार तथा संस्थापक ग.दि.कुलथे, अध्यक्ष विनोद देसाई, कोषाध्यक्ष नितीन काळे, सरचिटणीस समीर भाटकर आणि दुर्गा महिला मंचाच्या अध्यक्षा सिद्धी संकपाळ यांनी कळविले आहे.

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या वतीने उल्लेखनीय कार्याबद्दल ठाणे जिल्हा समन्वय समितीस “आदर्श जिल्हा” तसेच कार्यकारिणीचे अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने, सरचिटणीस तथा जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप आणि कोकण विभागीय सहसरचिटणीस तथा वैद्यकीय अधिकारी डॉ.अविनाश भागवत यांची “उत्कृष्ट कार्यकर्ता” म्हणून राज्यस्तरीय निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या वतीने उल्लेखनीय कार्याबद्दल निवासी उपजिल्हाधिकारी सतीश बागल, वस्तू व सेवा कर, बांद्रे, मुंबईच्या उपआयुक्त श्रीमती सुलभा भिलारे सणस, मुख्य अभियंता, सा.बां.वि., पुणे इंजि. अतुल चव्हाण, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई सहआयुक्त, सुनिल चव्हाण, मंत्रालय, मुंबई अवर सचिव, अशोक चेमटे, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख, राज्य परिवहन महामंडळाचे संचालक (वित्त) गिरीश देशमुख, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, बांद्रा, मुंबईचे सचिव संदिप देशमुख, अर्थ व सांख्यिकी, बांद्रा, मुंबईचे मुख्य संशोधन अधिकारी नवेंदु फिरके, आयुक्त कार्यालय, नागपूरचे उपायुक्त, डॉ. कमलकिशोर फुटाणे, गडचिरोलीच्या जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्रीमती प्रिती हिरळकर, पशुसंवर्धन, कारंजा (लाड), वाशिम सहाय्यक आयुक्त डॉ.संदिप इंगळे, शासकीय दंत महाविद्यालय, मुंबईचे सहयोगी प्राध्यापक डॉ.सोनाली कदम, भूमी अभिलेख, अमरावतीचे उपसंचालक डॉ.लालसिंग मिसाळ, मंत्रालयाचे अवर सचिव संतोष ममदापुरे, नागपूर जलसंपदा विभागाचे शाखा अभियंता इंजि. योगेश्वर निंबुळकर, कक्ष अधिकारी (16-अ), सा.प्र.वि., मंत्रालय श्रीमती पल्लवी पालांडे, सा.बां. वि., कोल्हापूरचे शाखा अभियंता इंजि. पुनम पाटील, वैद्यकीय अधिकारी, नांदेड डॉ. राजेंद्र पवार, लातूर जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता, इंजि. वाळासाहेब शेलार, कोल्हापूरचे अपर जिल्हाधिकारी संजय शिंदे यांनाही “उत्तम कार्यकर्ता” पुरस्कार तसेच कार्यालय सचिव रजनीश कांबळे यांना पत्रकारिता पदवी संपादन केल्याबद्दल “विशेष पुरस्कार” जाहीर झाला आहे.

त्याचप्रमाणे अमरावती, कोल्हापूर, नागपूर, नांदेड, मुंबई उपनगर, पुणे या जिल्हा समन्वय समितींनाही “आदर्श जिल्हा” पुरस्कार जाहीर झाला आहे.

तरी या पुरस्कार सोहळयास राजपत्रित वर्ग 1 व 2 अधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाच्या वतीने करण्यात आले आहे.

# आमदार किसन कथोरेच्या जनता दरबारास उत्स्फूर्त प्रतिसाद



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण (प्रतिनिधी) :

आमदार किसन कथोरे यांनी कल्याण तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांच्या अडी अडचणी, समस्या जाणून घेण्यासाठी कल्याण च्या शासकीय विश्रामगृहात जनता दरबार गुरुवारी घेतला यावेळी सर्वसामान्य नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यावेळी तहसीलदार, गट विकास अधिकारी, महावितरण चे अधिकारी, कृषी, शिक्षण, बांधकाम, पाणीपुरवठा, ग्रामपंचायत सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. आमदार किसन कथोरे यांनी यावेळी नागरिकांच्या अडी अडचणी सोडविण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केल्या यावेळी सरपंच, व कार्यकर्ते नागरिक मोठया संख्येत उपस्थित होते.

# मोटार वाहनांवर हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसवण्याचे निर्देश

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे(प्रतिनिधी) :

परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी महाराष्ट्र राज्यातील दि.01 एप्रिल 2019 पूर्वीच्या नोंदणीकृत मोटार वाहनांवर हाय सिक्युरिटी नंबरप्लेट (HSRP) बसविणे बंधनकारक करण्याबाबत सूचित केले आहे. राष्ट्रीय सुरक्षेसाठी, वाहनांमुळे होणारे गुन्हे कमी करण्यासाठी, छेडछाड आणि बनावटगिरी रोखण्यासाठी तसेच रस्त्यांवर चालणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांची ओळख पटविण्याकामी अशा अनेक प्रकारच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी मोटार वाहनांवरील हाय सिक्यूरिटी नंबरप्लेट (HSRP) बसविणे अत्यावश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने देखील सर्व मोटार वाहनांवर हाय सिक्युरिटी नंबर प्लेट (HSRP) बसविण्याबाबत निर्देश जारी केले आहेत.

हाय सिक्युरिटी नंबरप्लेट (HSRP) चे महत्व लक्षात घेता या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील दि.01 एप्रिल 2019 पूर्वीच्या नोंदणीकृत वाहनांवर HSRP नंबर प्लेट बसविणे बंधनकारक आहे. त्याकरिता परिवहन विभागाने या कार्यालयासाठी M/s REAL MAZON INDIA LTD., एजन्सीची नियुक्ती केली असून शुल्क आणि लागणारा वेळ/दिवस निर्धारित केले आहेत.

टू-व्हिलर्स आणि ट्रॅक्टर्स: रु.450, थ्री-व्हिलर्स: रु.500, लाईट मोटर वेहिकल्स/ पॅसेंजर कार/ मिडीयम कमर्शियल वेहिकल/ हेवी कमर्शियल वेहिकल आणि ट्रेलर/ कॉम्बिनेशन: रु.745 असे शुल्क आहेत.

या एजन्सीची HSRP बुकिंग पोर्टल लिंक https://hsrpmhzone2.in आहे. या लिंकवर वाहनांसंबधीत आवश्यक सर्व माहिती अचूक भरावी.

परिवहन विभागाच्या सूचनेनुसार लवकरच सर्व जुन्या वाहनांना त्यांची कागदपत्रे तपासून संबंधित एजन्सीकडून HSRP लावून मिळणार आहे. वाहनमालकांनी परिवहन विभागाने जारी केलेल्या SOP नुसार दि.31 मार्च 2025 पर्यंत जुन्या वाहनांना HSRP नंबर प्लेट लावणे अनिवार्य केले आहे, असे आवाहन कल्याण उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी केले आहे.

# महिला तक्रार निराकरणासाठी समिती नेमा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे(प्रतिनिधी) :

कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणूकीस प्रतिबंध कायद्यानुसार, 10 किंवा 10 पेक्षा अधिक कर्मचारी असलेल्या प्रत्येक आस्थापनेमध्ये महिला तक्रार निवारण समिती असणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक, खासगी आस्थापनांनी अशा समितीचे गठन करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय बागूल यांनी केले आहे.

शासकीय, निमशासकीय कार्यालय, संघटना, महामंडळे, आस्थापना, स्थानिक प्राधिकरण किंवा शासकीय कंपनी किंवा नगरपरिषद किंवा सहकारी संस्था अशा सर्व आस्थापना, तसेच कोणतेही खाजगी क्षेत्र, संघटना किंवा खाजगी उपक्रम/ संस्था, एंटरप्रायजेस, अशासकीय संघटना, सोसायटी, ट्रस्ट, उत्पादक, पुरवठा, वितरण व विक्री यासह वाणिज्य, व्यावसायिक, शैक्षणिक, करमणूक, औद्योगिक, आरोग्यसेवा किंवा वित्तीय कामकाज पार पाडणारे युनिट किंवा सेवा पुरवठादार, रुग्णालये, शुश्रुषालये, क्रिडा संस्था, प्रेक्षागृहे, क्रीडा संकुले आदी ठिकाणी किंवा अधिनियमात नमूद केलेल्या कामाच्या शासकीय व खाजगी क्षेत्रातील कार्यालयाच्या ठिकाणी शासन निर्णयाप्रमाणे अंतर्गत तक्रार समिती गठित करणे बंधनकारक आहे.

समिती न स्थापल्यास 50 हजार दंड- अधिनियम कलम 26 मध्ये जर एखाद्या मालकाने अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली नाही आणि कायद्यातील व नियमातील विविध तरतुदींचे व जबाबदाऱ्यांचे पालन न केल्यास मालकाला 50 हजार रुपयापर्यंत दंड होईल. दुस-यांदा आढळल्यास परवाना रद्द, दुप्पट दंड अशी तरतूद आहे.

तरी ठाणे जिल्ह्यातील सर्व आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती गठित करुन तसा अहवाल जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, ठाणे नियोजन भवन 2 माळा, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कोर्ट नाका ठाणे येथे तात्काळ सादर करावा, तसेच Email- dwedothane२३४@gmail.com, dwcdothane@yahoo.co.in या मेल आयडीवर पाठविण्यात यावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्री. संजय बागूल यांनी केले आहे.



## आर.पी.एफ ऐकणार दिव्यांग प्रवाशांच्या समस्या

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
डोंबिवली(प्रतिनिधी) :

रेल्वेगाडीतून प्रवास करताना दिव्यांग, अंध, अपंग प्रवाशांकरता राखीव डब्बा असतो.हे प्रवासी रेल्वेतून प्रवास करताना त्यांना येणाऱ्या अडचणी, समस्या याबाबत उपाययोजना असणे आवश्यक आहे. याकडे लक्ष देत डोंबिवली रेल्वे सुरक्षा बलाच्या नवीन कार्यालयात लवकरच दिव्यांग प्रवाशांची एक बैठक बोलावण्यात आली असल्याचे रेल्वे सुरक्षा बल वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजेंद्र राऊत यांनी दिली. दिव्यांग प्रवाशांच्या अनेक तक्रारी असून त्यांच्या राखीव डब्यात सामान्य प्रवाशीहि प्रवास करत असल्याने डब्यात प्रवास करणे मुश्किल होत असते. याबाबत रेल्वे सुरक्षा बल आणि डोंबिवली रेल्वे पोलिसांकडून कारवाई सुरु आहे. मात्र अजूनही काही प्रवासी या नियमाचे पालन करत नाही. याबाबत कडक करवाई करण्यात यावी अशी मागणी दिव्यांग प्रवाशांची आहे.

**डोंबिवलीत लवकरच होणार बैठक**

## अण्णा साळवे यांना समाजभूषण पुरस्कार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड(प्रतिनिधी) :

ठाणे जिल्ह्यातील आंबेडकर चळवळीचे लढाऊ नेतृत्व, अन्यायाविरोधात पेटून उठणारे अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे, तसेच संविधान हक्क परिषदेचे जिल्हाध्यक्ष आण्णा साळवे यांच्या सामाजिक,धार्मिक सांस्कृतिक राजकीय क्षेत्रातील केलेल्या कार्याची दखल घेत मंत्रालय वार्ताचे संपादक अनिल आहिरे, आणि निवड समितीच्या अध्यक्षा निशाताई भगत यांनी मंत्रालय वार्ताच्या "समाजभूषण" पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या त्यांच्या निवडीने आण्णा साळवे यांच्यावर सर्व स्थरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

या पुरस्कार वितरण सोहळयासाठी राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे अध्यक्ष मा शरदचंद्र पवार, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्याय मंत्री संजयजी क्षीरसाट,तसेच अन्न व औषध प्रशासन मंत्री महाराष्ट्र राज्य,नरहरी झिरवाळ उपस्थित राहून त्यांच्या शुभहस्ते आण्णा साळवे यांना सन्मानित करण्यात येणार आहे. यावेळी खासदार सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे खासदार श्रीकांत शिंदे, आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार बाळाजी किणीकर, सौ आमदार सुलभाताई गायकवाड,आमदार विश्वनाथ भोईर,रिपाई नेते अण्णा रोकडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.हा पुरस्कार सोहळा बुधवार दिनांक २९ जानेवारी २०२५ रोजी ठीक १२.०० वाजता,ठिकाण के.सी. गांधी विद्यालय ऑडिटोरियम, आर.पी. रोड., डी मार्ट समोर, हॉटेल जय मल्हार शेजारी, बैल बाजार, कल्याण (पश्चिम)येथे संपन्न होणार आहे.आण्णा साळवे यांच्या निवडीने त्यांचे ठाणे जिल्ह्यातून सर्व पक्ष संघटना यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# पत्रकारिता क्षेत्रात युवकांसाठी संधी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पारनेर(प्रतिनिधी) :



शिरापूर - पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. आजच्या आधुनिक युगात पत्रकारितेचे बहुआयामी स्वरूप आपणास पहावयास मिळते. प्रिंट मीडिया, डिजिटल मीडिया ही पत्रकारितेची महत्त्वाची अंग आहेत. आज अनेक दूरदर्शन वाहिन्या व वृत्तपत्रांना निवेदक, वार्ताहर यांची मोठ्या प्रमाणावर निकड भासत आहे. आजच्या युवा वर्गाने पत्रकारितेतील संधी ओळखून जर्नालिझम, मास मीडिया यांसारखे विविध कोर्स करून पत्रकारिता क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली पाहिजे. समाजकारण, राजकारण, धर्मकारण, प्रशासन, कायदा सुव्यवस्था आणि इतर क्षेत्रात पत्रकार बांधवांना विशेष मान दिला जातो , कारण ते प्रवाही पत्रकारिता करतात. म्हणूनच आजच्या युवावर्गाने या पत्रकारितेला व्यवसायाची एक संधी म्हणून पहावे. एकूणच युवावर्गास पत्रकारिता क्षेत्रात अनेक संधी आहेत, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अहिल्यानगर जिल्हा सचिव तथा दैनिक पारनेर समर्थचे संस्थापक , संपादक सुरेश खोसे पाटील यांनी केले.

पद्मभूषण लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे,अळकुटी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर तालुक्यातील शिरापूर येथे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराच्या निमित्ताने ' पत्रकारिता आणि रोजगाराच्या संधी ' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी पत्रकार सुरेश खोसे पाटील यांनी १९९३ पासून पत्रकारिता करतानाचे आलेले अनुभव सांगितले व पत्रकारितेचे महत्व विशद केले . [ यावेळी त्यांनी १९९३ पासून जिल्ह्यातील विविध वृत्तपत्रांसाठी ग्रामीण प्रतिनिधी म्हणून काम करताना प्रसिद्ध झालेल्या बातम्यां चा कात्रण फाईल उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थांनी पाहिले असता , एवढ्या जुन्या बातम्या पाहून सर्व भारावून गेले व एवढ्या बातम्यांचा संग्रह कसा केला , याचे सर्वांना कोडे पडले . ]

**तरुणांनी पत्रकारिता क्षेत्रात उतरावे - पत्रकार सुरेश खोसे पाटील**

पत्रकारिता इतिहास विभागप्रमुख प्रा. अर्जुन चाटे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून म्हणाले की , पत्रकार सुरेश खोसे पाटील यांच्यासारख्या ज्येष्ठ पत्रकारांचा आदर्श डोळयासमोर ठेवून तरुणांनी पत्रकारिता क्षेत्रात आपले नाव कमविले पाहिजे , जेणेकरून आपल्या कुटुंबाबरोबरच गावाचे ही नाव रोशन होते , असे म्हटले. प्राचार्या डॉ.कुंदा कवडे यांनी तरुणांनी दररोज दैनिक वृत्तपत्र वाचली पाहिजेत , त्यातील आशय समजावून घेत बौद्धिक विकास साध्य केला पाहिजे, असे म्हणत पत्रकारिता क्षेत्रातील तरुण वर्गाची भूमिका प्रतिपादित केली. तर प्रास्ताविक करताना प्रा . विशाल रोकडे यांनी पत्रकार सुरेश खोसे यांचा परिचय करून देताना , त्यांचे पत्रकारितेतील योगदानाबद्दलाचा आवर्जून उल्लेख करून तालुक्यातील पत्रकारां मध्ये पत्रकारितेच्या शिक्षणाबद्दल ही माहिती विशद केली .

या कार्यक्रमाप्रसंगी नितीन शेळके, राजुकाका देशपांडे, कार्यक्रम अधिकारी पोपट सुंबरे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. दशरथ पानमंद, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. राजाराम गोरडे, डेअरी डिप्लोमा प्राचार्य प्रशांत लोखंडे, प्रा. तांबे, राहुल बोरुडे, मनोहर कनिंगध्वज आणि प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व शिबिरार्थी विद्यार्थी मोठ्या उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.विशाल रोकडे, सूत्रसंचालन प्रा.स्वाती फापाळे यांनी केले , तर आभार कु. गायत्री गाडगे यांनी मानले.

# बलसाड पॅसेंजमध्ये पास धारकांसाठी कोच ठेवा

## केदार काळे यांची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
पालघर(प्रतिनिधी) :

बलसाड फास्ट पॅसेंजरने डहाणू पासून दैनंदिन कामासाठी मुंबईला जाणाऱ्या आणि येणाऱ्या, सरकारी कर्मचारी, नोकरीवाले, व्यापारी व भाजीपाला नेणारे शेतकरी / बागायतदार व यांना सोईस्कर गाडी आहे. पूर्वी डबल डेकर कोच होते, पण नवीन डबल डेकर नॉन एसी कोच रेल्वेने बनवणे बंद केले आहे व आत्ताचे बलसाड फास्ट पॅसेंजरचे डबल डेकर डबे वीस वर्षे जुने झाले आहेत हे कारण सांगून डबल डेकर डबे काढून सिंगल डेकर जुने डबे बसविले गेले आहेत. त्यामुळे दैनंदिन रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांचे खूपच हाल होत आहेत. म्हणून दैनंदिन प्रवाशांच्या वतीने शिवसेनेचे प्रवक्ते केदार काळे यांनी पश्चिम रेल्वेचे जनरल मॅनेज व पश्चिम रेल्वेचे डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर यांच्याकडे, गाडी नंबर 59024 /23 बलसाड फास्ट पॅसेंजरला किमान तीन ते चार रेल्वे सीजन तिकीट ( पास ) होल्डर साठी डबे ठेवावेत. तर त्यातील अर्धा कोच महिलांसाठी राखीव असावा. अशी मागणी एका मेल द्वारे केदार काळे रेल्वे अधिकारी यांना केली आहे. तर रेल्वे बोर्डाला विनंती करून नवीन नॉन एसी डबल डेकर कोच ( डबे ) लवकरात लवकर बनवून, बलसाड फास्ट पॅसेंजर व फ्लाईंग राणी या दोन्ही गाड्यांना पूर्वीप्रमाणे जोडण्यात यावेत. पालघर येथील जुना पालघर हनुमान मंदिर येथील पुर्व- पश्चिम भागाला जोडणारे रेल्वे फाटक अनेक वर्षापासून बंद करण्यात आले आहे. त्यामुळे तेथील जनतेला येण्या जाण्यासाठी आपला जीव धोक्यात टाकून रेल्वे रूळ ओलांडून जावे लागते. यासाठी त्या ठिकाणी फुटवर ब्रिज बनवण्यासाठी लवकर डी आर एम यांची शिष्टमंडळासह केदार काळे भेट घेणार आहेत.

## वाहतूक पोलिसांचा रिक्षा चालकांशी संवाद



दै.ठाणे जिवनदीप वार्ता
सफाळे (प्रतिनिधी) :

दरवर्षी प्रमाणे नवीन वर्षाच्या सुरुवातीला प्रवासी यांच्या सुरक्षित दृष्टीने मा. पोलीस अधीक्षक यांच्या आदेशानुसार पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या कडून प्रवासी वाहतूक करणारी वाहन धारक, यांच्यात सुरक्षिततेची जाणीव /जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने दिनांक १ जानेवारी ते २५ जानेवारी 'सुरक्षितता अभियान' राबविण्यात येत असते. सफाळे पालघर येथील परिसरातील तिन चाकी ( रिक्षा ) प्रवासी वाहतूक करणाऱ्या चालक-मालक यांच्या सफाळे पुर्व- पश्चिम रिक्षा स्टॅण्ड वर जाऊन, अरूण वैद्य- रेल्वे सुरक्षा बल पोलीस ( RPF ) सफाळे कार्यरत व नारायण धोंडगे - ट्राफिक पोलीस अधिकारी यांनी, त्याच्यांशी संवाद साधत. वाहतुकीच्या नियमा बद्दल माहिती दिली. जर कदाचित एखाद्या वेळेस अपघात घडला असताना काय करावे. काय करू नये, यासाठी योग्य ती माहिती देत. रिक्षा चालक - मालक यांना गणवेष परिधान करणे कसे बंधन कारक यावर चर्चा केली.

यावेळी तेथे उपस्थित असलेले मॅजिक चालक, व दुचाकी धारकांना सुध्दा नियमाचे पालन करण्यासाठी आवाहन केले.

## २२ जानेवारी हा दिवस 'सनातन दिवस' घोषित करा

दै.ठाणे जिवनदीप वार्ता
ठाणे(प्रतिनिधी) :

गेली पाँचशे वर्षाचे संघर्षानंतर आयोध्येतील राममंदिरामध्ये रामलल्लाची प्राण प्रतिष्ठा होणे ही बाब सर्व सनातनांसाठी गर्वाची आहे. ही ऐतिहासिक घटना इतिहासाच्या पानावर सोन्याच्या अक्षराने लिहिली जाईल. दि.22 जानेवारी 2024 हा पावन दिवस या घटनेचा साक्षीदार आहे. भविष्यातील सर्व पिढयांना या दिवसामुळे प्रेरणा मिळणार आहे. म्हणून 22 जानेवारी हा दिवस 'सनातन दिवस ' म्हणून घोषीत करावा अशी मागणी शिक्षण शक्ती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष कुँवर राकेश राजाबेटी गंभीर सिंह तोमर यांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांना निवेदनाद्वारे केली आहे.

## २६ जानेवारी रोजी ग्रामस्थांचे जनआंदोलन

दै.ठाणे जिवनदीप वार्ता/ वासिंद(प्रतिनिधी) :

वासिंद येथील दहागांव ग्रामपंचायत हद्दीतील दहागांव, कातबाव व चाफ्याचा पाडा येथे मंजूर असलेले विद्युत काम सुरू न झाल्याने येत्या 26 जानेवारी रोजी शहापूर महाराष्ट्र राज्य विज वितरण कार्यालय जवळ जन आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

दहागांव, कातबाव व चाफ्याचा पाडा येथे नव्याने विद्युत खांब, वाहिन्या बदलू व नवीन ट्रान्सफॉर्मर उभारणे या कामी मागील वर्षी फेब्रूवारी महिन्यात आदिवासी विकास प्रकल्प व जिल्हा नियोजन समिती यांच्या प्रशासकीय मंजुरी व निधी वितरण केले असून आजपावेतो कुठल्याही प्रकारे काम सुरू करण्यात आलेले नाही त्यामुळे कार्यकारी अभियंता कल्याण व उपकार्यकारी अभियंता शहापूर यांच्या कडे निवेदन देण्यात आले आहे.

सदर, कार्यालयात यासंदर्भात अनेकदा विचारणा करण्यात आली असताना याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही त्यामुळे येथील ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागत आहे. तर या कामासाठी प्रशासकीय मंजुरी व निधी वितरण होऊन वर्ष झाले तरीही काम न सुरू झाल्यामुळे येत्या 26 जानेवारी रोजी जन आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

## आ.राजेंद्र गावीत यांचा राज्यपालांच्या हस्ते सन्मान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
पालघर(प्रतिनिधी) :



अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र यांच्या वतीने सन २०२४ निवडणूकीत निवडून आलेले, नव निर्वाचित जनजातीचे खासदार आणि आमदार यांचा यथोचित सत्कार समारंभ दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी. सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे आयोजित करण्यात आलेला या समारंभाचे अध्यक्ष - प्रा. डॉ. अशोक उईके - आदिवासी विकास मंत्री महाराष्ट्र, प्रमुख अतिथी सी. पी. राधाकृष्णन - राज्यपाल महाराष्ट्र राज्य, प्रमुख वक्ते सत्येंद्र सिंह अध्यक्ष अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रम, आणि विष्णू सुरू - महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष- अखिल भारतीय वनवासी कल्याण आश्रम, नरहरी झिरवाळ - अन्न व औषध प्रशासन विशेष सहाय्य मंत्री महाराष्ट्र, आदी याच्या उपस्थित आणि मान्यवर श्री. पी. सी. राधाकृष्णन - राज्यपाल महाराष्ट्र यांच्या हस्ते शाल- पुष्पगुच्छ व सन्मान चिन्ह देऊन राजेंद्र गावीत आमदार पालघर विधानसभा यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी मा. श्री. पी. सी. राधाकृष्णन - राज्यपाल महाराष्ट्र यांनी सांगितले, आदिवासी यांच्या उन्नती साठी राज्य सरकार कटीबद्ध आहे. तसेच आदिवासी समाजाच्या असलेल्या समस्यांवर कार्यक्षम पणे उपाय योजना राबविण्यासाठी आवश्यक ते कार्य प्रभावी पणे राबविण्यात यावे. यासाठी नवनिर्वाचित आदिवासी खासदार / आमदार यांनी पुढाकार घेऊन उपाययोजना चालना देण्यासाठी सातत्याने लक्ष देऊन कार्यासाठी पाठपुरावाही करणे आवश्यक आहे.

मा. डॉ. अशोक उईके - आदिवासी विकास यांनी आदिवासींसाठी सुरू असलेल्या योजनांचा आढावा घेत, आगामी काळात आणखी प्रभावी उपाययोजना राबवण्याचे आश्वासन दिले. सत्येंद्र सिंह अखिल भारतीय वनवासी अध्यक्ष यांनी, आदिवासी समाजाच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी संस्थेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या प्रयत्नांची माहिती दिली. कार्यक्रम समारंभासाठी आलेले / उपस्थित असलेले मान्यवर / खासदार / आमदार आदींनी. आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी एकत्रितपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील सर्व खासदार / आमदार यांनी मोठ्या संख्येने उपस्थित सहभागी झालेले दिसून आले आहे.

## प्रजासत्ताक दिनी आदिती तटकरे यांच्या हस्ते ध्वजारोहण

रायगड : भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त रायगड जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ रविवार, दि.२६ जानेवारी २०२५ रोजी महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे यांच्या हस्ते अलिबाग पोलीस मुख्यालय मैदान येथे सकाळी ९.१५ वा.संपन्न होणार आहे.

ध्वजारोहणाच्या वेळी राष्ट्रीय/ समारंभीय पोषाख परिधान करण्यात यावा.

नागरिकांनी, प्रसारमाध्यम प्रतिनिधींनी या समारंभासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### पनवेल येथून निघणार
## "विश्व शांती परिक्रमा"

अलिबाग : रायगड जिल्ह्यातील अभिजित सिंह कोहली (पळस्पे, पनवेल) आणि कुंदन सुळे (कर्जत) हे युवा तरुण दुचाकीस्वार त्यांच्या सहकाऱ्यांसोबत अभिषेक नलावडे (ठाणे), अंबरीश पुल्ली (पुणे) आणि अजित माळी (सांगली) २५ जानेवारी रोजी पनवेल (पळस्पे) येथील महाऑटोव्हील्स येथून ६ हजार किलोमीटरच्या विश्व शांती परिक्रमा प्रवासाला सुरुवात करणार आहेत.

ते सुमारे २० दिवसात भारतातील सहा राज्ये आणि नेपाळमधील काही ऐतिहासिक ठिकाणांना भेट देणार आहेत. या राईडमध्ये ते भगवान गौतम बुद्धांनी त्यांच्या जीवनकाळात वास्तव्य केलेल्या सर्व महत्वाच्या स्थळांना भेट देऊन तेथील इतिहास आणि बुद्धांनी दिलेला शांतीसंदेश सर्वत्र पसरवण्याचा प्रयत्न करणार आहेत. तसेच या प्रवासात दुचाकी चालवताना स्वतःच्या सुरक्षेसाठी हेल्मेट वापरणे व वाहतुकीचे नियम पाळणे इत्यादींचे महत्व लोकांना पटवून देण्यासाठी भेटी घेणार आहेत. या प्रवासाचा जागतिक शांती, रस्ते सुरक्षा यांसोबतच पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे असा या तरुणांना विश्वास आहे.या उपक्रमाची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस् मध्ये करण्यासाठीही हे तरुण प्रयत्नशील आहेत. यापूर्वीही अभिजित सिंह यांनी आझादी की अमृत परिक्रमा या राईडसाठी दोन इंडिया बुक ऑफ रेकॉर्डस् तसेच हार्वर्ड वर्ल्ड रेकॉर्ड मिळवले आहेत. अनुभवी संघ सोबत असल्यामुळे विश्व शांती परिक्रमा नक्कीच यशस्वी होईल आणि सर्व उद्दिष्टे पूर्ण होतील हा विश्वास कुंदन सुळे व अभिजित सिंह यांनी पत्र व्यक्त केला.

## रिक्त पदांकरिता माजी सैनिकांनी अर्ज करावेत

दै.ठाणे जिवनदीप वार्ता/ रायगड(प्रतिनिधी) :

महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या.(मेस्को) पुणे यांचे पत्र दि. 13 जानेवारी 2025 अन्वये माजी सैनिक/विधवा/युद्ध विधवा यांच्याकरिता कर्मचारी वर्ग-मेस्को पर्यवेक्षक, वाहन चालक, लिपिक, शिक्षण आणी शारीरीक प्रशिक्षण प्रशिक्षक, स्टोअर किपर सह कँटीन आणी वसतिगृह पर्यवेक्षक, कार्यालयीन परीचर, अधिकारी वर्ग- प्रकल्प व्यवस्थापक, क्षेत्रिय व्यवस्थापक, व्यवस्थापक, व्यवस्थापक लेखमाजी अशा एकूण-27 रिक्त पदांसाठी वर्गवारी नुसार भरती करावयाची असून जिल्ह्यातील इच्छुक माजी सैनिकांनी रिक्त पदांकरीता अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड- ले.कर्नल राहुल वैजनाथ माने (निवृत) यांनी केले आहे.

याकरिता सैनिक उमेदवाराचे शिक्षण इयत्ता दहावी पास अथवा सैन्य दलाकडून समकक्ष प्रमाणपत्र असावे. भारतीय सेनेमध्ये कमीतकमी 15 वर्षे सेवा झालेली असावी. वय 58 वर्षापेक्षा नसावे. अर्ज करण्याचा नमुना www.mescoltd.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जिल्हयामधील इच्छूक माजी सैनिक उमेदवारांनी अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख 27 जानेवारी 2025 अशी आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - अॅड. जयकुमार ए. रिजवानी